एकात्मिक प्रकल्प व्यवस्थापन कक्षाची (Unified Project Management Unit UPMU) कार्यकक्षा वाढविणेबाबत........

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग

शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण-२०२२/प्र.क्र.६३/भूमापन

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई – ४०००३२.

दिनांक : १५ जुलै २०२६.

संदर्भ :- १) शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०२२/प्र.क्र.६३/ल-१, दिनांक १८ एप्रिल, २०२२

२) शासन निर्णय क्र.आस्था-२०१७/५५५/प्र.क्र.१०५/आस्था-६, दिनांक ११ मार्च, २०२६

प्रस्तावना :-

महसूल विभाग, भूमी अभिलेख विभाग तसेच नोंदणी व मुद्रांक विभागामार्फत भूमी अभिलेख, नोंदणी, महसूल प्रशासन यांचेकडील नागरिकाभिमुख सेवांशी संबंधित विविध माहिती तंत्रज्ञान प्रणालींची निर्मिती, अंमलबजावणी व देखभाल करण्यात येत आहे. त्यामुळे या तिनही विभागातील संगणकीकरणाच्या कामकाजाचे परिचालन, व्यवहार्यता, राज्यव्यापी अंमलबजावणी तसेच समन्वयाच्या अनुषंगाने एकात्मिक प्रकल्प व्यवस्थापन कक्षाची स्थापना संदर्भ येथे नमूद शासन निर्णयान्वये करण्यात आली आहे.

महसूल विभागाने अलिकडील काळात घेतलेल्या निर्णयांची शासनाकडून परिणामकारक अंमलबजावणी पारदर्शकपणे, कार्यक्षम, गतिमान पध्दतीने व्हावी अशा जनतेकडून असलेल्या अपेक्षांची पुर्तता करण्याकरीता तंत्रज्ञानाधिष्ठित प्रशासन निर्माण करण्याच्या उद्देशाने विविध डिजिटल प्रणाली, एकात्मिक सेवा, कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित उपाययोजना तसेच आधुनिक माहिती तंत्रज्ञान प्रकल्प विकसित करण्यात येत आहेत. यास्तव शासनाच्या सर्वोच्च प्राधान्याच्या प्रकल्पांची मिशन मोडमध्ये अंमलबजावणी करण्याकरीता स्थापन करण्यात आलेल्या एकात्मिक प्रकल्प व्यवस्थापन कक्षाची कार्यकक्षा वाढविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यास अनुसरुन पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

शासन निर्णय :-

१) महसूल विभागातील माहिती तंत्रज्ञान प्रकल्पांचे धोरणात्मक समन्वयन, भविष्यातील डिजिटल भूमी व्यवस्थापन प्रणालींचे नियोजन, आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर, तसेच नागरिकाभिमुख सेवांमध्ये सातत्याने सुधारणा करण्यासाठी एकात्मिक प्रकल्प व्यवस्थापन कक्षाच्या कार्यकक्षेत सुधारणा करणेत येत आहे.

२) महसूल विभाग, भूमी अभिलेख विभाग, नोंदणी व मुद्रांक विभाग तसेच महसूल विभागाशी संबंधित इतर माहिती तंत्रज्ञान प्रणालींमध्ये एकात्मिक समन्वय प्रस्थापित करून शासनाच्या प्राधान्याच्या प्रकल्पांची प्रभावी, गतिमान व कालबद्ध अंमलबजावणी करणे हे एकात्मिक प्रकल्प व्यवस्थापन कक्षाचे प्रमुख कार्य राहील.

३) एकात्मिक प्रकल्प व्यवस्थापन कक्ष हे राज्यस्तरीय प्रकल्प व्यवस्थापन, प्रगती परीक्षण, धोरणात्मक मार्गदर्शन, आंतरविभागीय समन्वय तसेच शासनाच्या निर्देशानुसार विशेष प्रकल्पांच्या Fast Track अंमलबजावणीसाठी नोडल यंत्रणा म्हणून कार्य करील.

४) एकात्मिक प्रकल्प व्यवस्थापन कक्षाची प्रमुख उद्दिष्टे पुढीलप्रमाणे राहतील,

अ) महसूल विभाग व इतर शासकीय विभागासोबत माहिती तंत्रज्ञान प्रकल्पांचे एकात्मिक व्यवस्थापन करणे.

ब) शासनाच्या प्राधान्याच्या प्रकल्पांची निश्चित कालमर्यादेत प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करणे.

क) महसूल, भूमी अभिलेख, नोंदणी व मुद्रांक विभागांमधील प्रभावी समन्वय प्रस्थापित करणे.

ड) शासनाच्या धोरणात्मक निर्णय प्रक्रियेस आवश्यक तांत्रिक, व्यवस्थापकीय व प्रकल्पविषयक सहाय्य करून देणे.

इ) नागरिकाभिमुख सेवा अधिक पारदर्शक, सुलभ, कार्यक्षम व गतिमान करण्यासाठी आवश्यक प्रकल्प राबविणे.

५) एकात्मिक प्रकल्प व्यवस्थापन कक्षास आवश्यक असणा-या धोरणात्मक बाबींची अंतिम निर्णय तसेच या कक्षामार्फत राबविण्यात येत असलेल्या प्रकल्पांचा आढावा संदर्भ शासन निर्णयान्वये गठीत करण्यात आलेल्या एकत्रित धोरण समितीमार्फत घेण्यात येतील.

६) प्रशासकीय नियंत्रण :-यापुर्वीप्रमाणेच एकात्मिक प्रकल्प व्यवस्थापन कक्षाचे प्रशासकीय नियंत्रण हे जमाबंदी आयुक्त व संचालक भूमि अभिलेख, पुणे यांचे राहील.

७) समन्वय अधिकारी :- एकात्मिक प्रकल्प व्यवस्थापन कक्षासाठी नियुक्त अपर जिल्हाधिकारी /अप्पर जिल्हाधिकारी (निवडश्रेणी) हे समन्वय (नोडल) अधिकारी, एकात्मिक प्रकल्प व्यवस्थापन कक्ष म्हणून कार्य करतील. तसेच सदर समन्वय अधिकारी हे जमाबंदी आयुक्त व संचालक भूमि अभिलेख, पुणे यांच्या अधिनस्त कार्यरत असतील.

महसूल विभागामधील महसूल माहिती तंत्रज्ञान(Revenue IT), नोंदणी व मुद्रांक माहिती तंत्रज्ञान (IGR IT), भूमापन माहिती तंत्रज्ञान (Survey IT), नगर भूमापन माहिती तंत्रज्ञान (City Survey IT), तसेच महसूल विभागाच्या अधिपत्याखालील इतर क्षेत्रीय कार्यालयांमार्फत राबविण्यात येणाऱ्या माहिती तंत्रज्ञान प्रकल्पांमध्ये आवश्यक परस्पर सुसंगती (Inter-operability), माहितीची देवाणघेवाण (Data Exchange), प्रणाली एकात्मीकरण (System Integration) तसेच शासनाच्या धोरणांशी सुसंगत अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी आवश्यक समन्वय एकात्मिक प्रकल्प व्यवस्थापन कक्ष मार्फत करण्यात येईल.

८) प्राधान्याचे (**Fast Track**) प्रकल्प :- एकात्मिक प्रकल्प व्यवस्थापन कक्षामार्फत पुढील प्राधान्याचे (**Fast Track**) प्रकल्प राबविण्यात येतील:

१) महसूल प्रशासकीय विभागाची वेबसाईट विकसित करणे, अद्यावत ठेवणे व त्याची देखभाल करणे.

२) जमीन माहितीपीठ (Land Dashboard)

- ✓ यामध्ये शासकीय जमीन, इतर प्रशासकीय विभाग किंवा संस्था (शासकीय / खाजगी) यांना वाटप शासकीय जमीन, पर्यायी वनीकरणासाठी उपलब्ध जमीन याबाबतची अद्यावत सद्यस्थिती दर्शविणारा Land Dashboard करणे अपेक्षित आहे.

३) प्रत्यय (Revenue Court Case Monitoring System-eQJ Court २.०)

४) महसूल मंत्री सनियंत्रण कक्ष (Revenue Minister War Room)

५) भूमी संपादन व्यवस्थापन प्रणाली (Land Acquisition Portal)
६) सुधारित महाभूमी संकेतस्थळ व मोबाईल ॲप
७) हेल्पडेस्क व IVR प्रणाली
८) सेवादूत प्रणाली
९) ई-नझूल प्रणाली
१०) महसूल विभागाच्या अधिनस्त अधिकारी यांचेसाठी बदली प्रणाली तयार करणे (Online Transfers)
११) महसूल विभागासाठी Gen AI आधारित Chatbot
१२) महाराजस्व ॲप तयार करणे
१३) IGOT साठी आवश्यक असणारे कोर्सेस तयार करणे व ते अपलोड करणे
१४) महसूल विभागाच्या प्रस्तावित Land Records Field Monitoring Software या प्रकल्पाचे प्रगती परिक्षण, आवश्यक मार्गदर्शन करणे
१५) पाणंद रस्ते पोर्टल विकसित करणे, अद्यावत ठेवणे व त्याची देखभाल करणे.
१६) शासन निर्णय दि.२५/३/२०२६ अन्वये अतिक्रमण नियमानुकुल करण्याबाबत घेतलेल्या निर्णयाचे प्रगती अहवाल अद्यावत करण्यासाठी पोर्टल तयार करणे
१७) महाराष्ट्र धारण जमिनीचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत अधिनियमामध्ये दि.१५ नोव्हेंबर १९६५ रोजी किंवा त्यानंतर व दि.१५ ऑक्टोबर २०२४ पर्यंत प्रमाणभूत क्षेत्रापेक्षा कमी झालेले तुकडे यांचे मानीव नियमितीकरण करण्याबाबत करण्यात आलेल्या सुधारणेस अनुसरुन झालेल्या नियमितीकरणाबाबतचा आढावा घेण्याकरीता पोर्टल तयार करणे

याशिवाय, मा.मंत्री (महसूल) अथवा अपर मुख्य सचिव (महसूल) यांनी वेळोवेळी निर्देशित केलेले इतर विशेष प्रकल्प एकात्मिक प्रकल्प व्यवस्थापन कक्षामार्फत Fast Track पद्धतीने राबविण्यात येतील. या शासन निर्णयानुसार एकात्मिक प्रकल्प व्यवस्थापन कक्ष हे शासनाच्या सर्व विद्यमान व भावी प्राधान्याच्या माहिती तंत्रज्ञान प्रकल्पांसाठी Fast Track Project Delivery Unit म्हणून कार्य करेल.

९) आढावा :- एकात्मिक प्रकल्प व्यवस्थापन कक्षामार्फत राबवावयाच्या प्रकल्पांचे प्राधान्यक्रम शासनामार्फत निश्चीत करुन देण्यात येतील. या कक्षामार्फत राबविण्यात येत असलेल्या प्रकल्पांचा आढावा दर १५ दिवसांनी शासनास सादर करण्यात यावा. तसेच आवश्यकतेनुसार प्रकल्पांच्या प्रगतीबाबत अहवाल, विश्लेषणात्मक नोंदी, सादरीकरणे व शिफारशी शासनास सादर करण्यात येतील.

१०) जमीन व्यवस्थापना संबंधी देशभरातील सर्वोत्तम पद्धतींचा अभ्यास :- भूमी अभिलेख, नोंदणी, महसूल प्रशासन तसेच नागरिकाभिमुख सेवा या क्षेत्रांमध्ये देशातील विविध राज्यांमध्ये राबविण्यात येणाऱ्या नाविन्यपूर्ण प्रकल्पांचा अभ्यास एकात्मिक प्रकल्प व्यवस्थापन कक्ष मार्फत करण्यात येईल. तसेच शासनाच्या धोरणात्मक निर्णय प्रक्रियेस सहाय्यभूत ठरतील अशा शिफारशी वेळोवेळी शासनास सादर करण्यात येतील.

११) मनुष्यबळ :- एकात्मिक प्रकल्प व्यवस्थापन कक्ष चे कामकाज प्रभावीपणे पार पाडण्यासाठी संदर्भ क्र.२ अन्वये पुढीलप्रमाणे राज्यस्तरीय जमाबंदी आयुक्त व संचालक भूमि अभीलेख, पुणे कार्यालयाच्या मंजूर आकृतिबंधामध्ये मनुष्यबळाची उपलब्धता करुन देण्यात आली आहे. त्या व्यतिरिक्त आणखी मनुष्यबळाची आवश्यकता भासल्यास जमाबंदी आयुक्त, पुणे यांनी त्यांच्या कार्यालयास मंजूर आकृतीबंधातून आंतर समायोजनाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

१२) या शासन निर्णयाच्या अंमलबजावणीमुळे यापूर्वी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयांमधील या शासन निर्णयाशी विसंगत असलेल्या तरतुदी या शासन निर्णयाच्या मर्यादेपर्यंत अधिलिखित (Superseded) समजण्यात येतील. या शासन निर्णयाशी विसंगत नसलेल्या इतर सर्व तरतुदी पूर्ववत संदर्भ क्र.१ मधील शासन निर्णयानुसार लागू राहतील.

१३) सदर शासन निर्णय हा www.maharashtra.gov.in या महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकतांक हा २०२६०७१५१९०८००३५४८ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SANJAY
RAGHUNATH
BANKAR

Digitally signed by SANJAY RAGHUNATH BANKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, 2.5.4.20=C8A7D6860FF227FD9E69A02E9CA5DFB2CCB25EDA92D749629970F349FC6ED260, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=C5917E56B0DA516AB259D846D516CB0584DCE5E9A2E73C0A35FA47BAB64E88AA, cn=SANJAY RAGHUNATH BANKAR
Date: 2026.07.15 20:06:29 +05'30'

(संजय बनकर)

सह सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१. मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव, लोकभवन, मुंबई.
२.मा. मंत्री (महसूल)/ मा. राज्यमंत्री (महसूल), मंत्रालय, मुंबई
३. मा.अपर मुख्य सचिव (महसूल, मुद्रांक शुल्क व नोंदणी) महसूल व वन विभाग.
४. प्रधान सचिव (मदत व पुनर्वसन) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. अपर मुख्य सचिव (वने), महसूल व वन विभाग, मुंबई.
५. अपर मुख्य सचिव (वित्त) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे.
७. नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे,
८. सर्व विभागीय आयुक्त.
९. विभागीय आयुक्त, पुणे.
१०. सर्व जिल्हाधिकारी.
११. सह सचिव (म-१), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२. सह सचिव (भुसंपादन) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३. सह सचिव / उप सचिव (भूमापन), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४. उप सचिव (मदत व पुनर्वसन), महसूल व वन विभाग.
१५. सर्व सह जिल्हा निबंधक व मुद्रांक जिल्हाधिकारी.
१६. नोंदणी उपमहानिरीक्षक (माहिती व तंत्रज्ञान)
१७. विभागीय नोंदणी उपमहानिरीक्षक.
१८. सर्व उपसंचालक, भूमी अभिलेख.
१९. सर्व जिल्हा अधिक्षक, भूमी अभिलेख.
२०. राष्ट्रीय सुचना विज्ञान/CDAC अधिकारी.
२१. राज्य सूचना विज्ञान अधिकारी, राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र, मुंबई.
२२. जिल्हा सुचना विज्ञान अधिकारी.
२३. अपर जिल्हाधिकारी, एकात्मिक प्रकल्प अंमलबजावणी कक्ष.
२४. राज्य समन्वयक, ई-फेरफार प्रकल्प.
२५. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परिक्षण) महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर
२६. महालेखापाल (वाणिज्यिक लेखा परिक्षा) मुंबई.

२७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
२८. निवासी लेखा परिक्षण अधिकारी, मुंबई
२९. निवड नस्ती (भूमापन).